# जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती बैठक
# दिनांक 11/01/2023 चे इतिवृत्त

मा. श्री पृथ्वीराज बी.पी. भा.प्र.से., जिल्हाधिकारी, लातूर यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे दिनांक 11 जानेवारी, 2023 रोजी दुपारी 3.30 वाजता संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समिती बैठकीचे इतिवृत्त.

श्री पी.डी.हणबर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी मा. जिल्हाधिकारी, लातूर यांच्या परवानगीने उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात केली. मागील बैठकीचे इतिवृत वाचन करून व नवीन विषयावर खालील प्रमाणे चर्चा करुन निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विषय | मुद्दा उपस्थित करणा-यांचे नांव | बैठकीमध्ये झालेली चर्चा व ता.अध्यक्षांनी दिलेले निर्देश | संबंधित यंत्रणा |
|---|---|---|---|---|
| 1 | औसा तालुक्यातील 4 कोल्ड स्टोरेज अपग्रेडेशन बाबत | श्री यलाले, के.वाय. ॲग्रो एक्सपोर्ट, लातूर | 1. मॅगनेट योजने अंतर्गत प्रस्ताव सादर करणे<br>2. एफ.पी.ओ. तयार करुन स्मार्ट अंतर्गत प्रस्ताव सादर करणे | श्री यलाले / जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, लातूर |
| 2 | ODOP प्रोडक्ट एक्सपोर्ट करीता राज्य शासनाकडून खास योजना असावी | श्री नितीन कलंत्री, दाळ मिल उद्योजक | 1. ट्रेड फेअर पार्टीशिपेशन साठी अनुदान मिळावे.<br>2. ट्रेड फेअर ॲग्री प्रॉडक्टसाठी वार्षिक कॅलेंडर मिळावे.<br>3. बोरसुरी दाळ जी.आय. मिळणेबाबत प्रस्तावाचा पाठपुरावा व्हावा.<br>4. ॲग्रो / ODOP एक्सपोर्ट करीता प्रायव्हेट कमर्शियल कन्सल्टंटच्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात. | जिल्हा उद्योग केंद्र<br>-""-<br><br>जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी<br>उद्योग संचालनालय, मुंबई |
| 3 | ODOP प्रोडक्ट करीता गोडाऊन / वेअरहाऊस सुविधा / प्रोत्साहन अनुदान बाबत | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. नाबार्डच्या योजने अंतर्गत ॲग्री एक्सपोर्ट इन्फ्रास्टक्चर सुविधासाठी नाबार्ड DDM यांनी प्रस्ताव तयार करावा.<br>2. MCCI फॅसीलीटेशन सेंटर लातूर येथे होणेबाबत शक्यता पहावी. | DDM, नाबार्ड, लातूर |
| 4 | एक्सपोर्ट अर्थसहाय्य करीता बँक सेवा मिळणेबाबत. | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. लातूर येथे फोरेस सुविधा नसल्याने SBI औरंगाबाद येथून एक्स्टेंशन काऊंटर सुविधा आठवडयास किंवा 15 दिवसास उपलब्ध व्हावी.<br>2. एक्सपोर्ट कर्जासाठी ODOP उद्योजक / निर्यातदार / दाळमिल उद्योजक यांनी बँकेसोबत बैठक आयोजित करावी. | LDM, लातूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | ऑरगॅनिक फार्मींगबाबत प्रचार / प्रसार होणे, दाळीकरीता बायसेलार मिट आयोजित करणे | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | 1. ऑरगॅनिक फार्मींगसाठी कृषी खात्याने प्रयत्न करावेत. तीन वर्षाचा आराखडा तयार करावा.<br>2. बोरसुरी दाळ जीआय पाठपुरावा करावा.<br>3. दाळमिल/सोयाबीन उद्योजक / ट्रेडर व्यापारी यांची बैठक घेऊन त्यांना निर्यातीसाठी आवश्यक वाटणा-या सुविधा व अडचणी, मुलभूत सुविधा व निर्यात वाढीसाठी समग्र आराखडा तयार करावा. एक्सपोर्टचा डाटा एकत्र करावा.<br>4. शेतमाल निर्यात सुविधा सेल कार्यरत करावा.<br>5. ॲपेडाच्या सुविधा/योजना उपलब्ध करुन घ्याव्यात.<br>6. केशर अंबा निर्यातीसाठी FPO तयार करावा.<br>7. दाळमिल व सोयाबीन उद्योगातील इंडस्ट्रीयल वेस्ट बाबत माहिती सादर करणे | SAO, लातूर<br>ADM, लातूर<br>श्री कलंत्री<br>श्री बिदादा |
| 6 | 10 फेब्रुवारी International Pulse Day बाबत नियोजन करणे | श्री कलंत्री, दाळ मिल उद्योजक | 10 फेब्रुवारी International Pulse Day बाबत नियोजन करणेसाठी दाळ मिल उद्योजक, श्री कलंत्री, श्री बिदादा, जिल्हा उद्योग केंद्र यांची SAO यांनी बैठक घेऊन कार्यक्रम तयार करणे, दाळ व मध यांचे गिफ्ट हॅपर तयार करणे. | श्री बिदादा, श्री कलंत्री व SAO, लातूर |
| 7 | दाळमिल, मध, सोया एक्स्ट्रक्शन साठी कुशल तांत्रिक कामगार तयार करणे | श्री बिदादा, दाळ मिल उद्योजक | दाळ मिल व सोयाबीन युनिट सोबत चर्चा करुन त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे तांत्रिक प्रशिक्षण देणेबाबत अभ्यासक्रम बाबत शक्यता पहाणी. 10 फेब्रुवारी पर्यंत ODOP निगडीत स्किल ट्रेनिंग व कोर्स डिझाईन तयार करणे. उदा.सॉरटेक्स ऑपरेटर, दाळ मिल् ऑपरेटर, फिटर, वेल्डर इ. | सहाय्यक आयुक्त, स्किल डेव्हलपमेंट |
| 8 | MIDC अंतर्गत सुविधा/ वेस्ट रिसायकल बाबत. | श्री बिदादा दाळ मिल उद्योजक | 1. MIDC अंतर्गत रोड, स्ट्रेट लाईट, ट्रक टर्मिनल बाबत माहिती सादर करणे.<br>2. दाळमिल व सोयाबीन उद्योगातील इंडस्ट्रीयल वेस्ट बाबत माहिती सादर करणे | प्रा.अ., मऔविम व का.अ. मऔविम, लातूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 9 | दाळ मिल उद्योग व सोयाबीन उद्योग यांची माहिती मिळणेबाबत | SAO लातूर | लातूर जिल्हयातील सर्व दाळ मिल उद्योग व सोयाबीन उद्योजक / व्यापारी असोसिएशन यांची बैठक घेऊन माहिती उपलब्ध करुन दयावी.<br>1. युनिटवाईज व वर्षवाईज एक्सपोर्टचा डाटा<br>2. स्कील कामगार मागणी<br>3. आवश्यक बँकींग सेवा<br>4. दाळमील व सोयाबीन उद्योगामधील इंडस्ट्रील वेस्ट डाटा & कंपोजीशन<br>5. आवश्यक एक्सपोर्ट इन्फ्रास्टक्चर<br>6. बैठक आयोजित करुन माहिती जानेवारी 23 अखेर सादर करावी. | श्री बिदादा श्री कलंत्री यांनी दाळमिल/व्यापारी असोसिएशन बैठकीबाबत आयोजन करावे.<br><br>ADM लातूर यांनी सोयाबीन मिल उद्योजक/ व्यापारी असोसिएशन बैठकीबाबत आयोजन करावे. |

**वरील प्रमाणे कार्यवाही करुन जानेवारी अखेर सर्व यंत्रणांनी अहवाल सादर करावा अशा मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या. तसेच 1. ODOP बायर सेलर मिट बाबत आयोजन कामी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पुढाकार घ्यावा असे सांगितले. 2. ट्रेड फेअर, कॅलेंडर व शासनाच्या सुविधाबाबतची माहिती जिल्हा उद्योग केंद्र यांनी सादर करावी. 3. राज्य शासनाने एक्सपोर्ट इन्फ्रास्टक्चर सुविधासाठी व ODOP एक्सपोर्टसाठी खास योजना तयार करण्यासाठी राज्य शासनास कळवावे, अशी सूचना केली. ODOP व अॅग्री एक्सपोर्टसाठी खाजगी कन्सल्टंशीच्या सुविधा शासनाने घेण्यास एम्पॅनेल करावे अथवा त्यासाठी अनुदान उपलब्ध करुन दयावे. 4. जिल्हा स्तरावर एक्सपोर्ट / ODOP सेलसाठी इस्फ्रास्टक्चर सुविधा, स्टाफ आवश्यक निधी उपलबध करुन दयावा, असे शासनास कळविण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचना दिल्या.**

**शेवटी श्री पी.डी.हणबर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, लातूर यांनी उपस्थितांचे आभार माणून मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.**

**महाव्यवस्थापक**
**जिल्हा उद्योग केंद्र, लातूर**

**जिल्हाधिकारी**
**लातूर.**